
नक्षत्र उत्सव कलेक्शन

# हस्तकला उपक्रम

००१

## दिवाळी सजावट - पणत्या रंगवणे



लेखन, मांडणी, सजावट: स्वाती फडणीस

ई साहित्य प्रतिष्ठान

## दिवाळी - एक दीपोत्सव

उपलब्ध पुराव्यांनुसार दिवाळी हा सण किमान तीन हजार वर्षे जुना आहे. पण त्या वेळी त्याचे स्वरूप आजच्यापेक्षा खूपच भिन्न होते. निसर्गाने पावसाळ्यात भरभरून दिलेल्या समृद्धीचा आनंद उत्सव, कृतज्ञतेचा हा सोहळा. प्राचीन साहित्यात या रात्रीचे वर्णन 'यक्षरात्री' असे आहे.

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण भारतात दिवाळीच्या उत्सवाचे स्वरूप साधारणपणे सारखंच आहे. घरं स्वच्छ झाडून, सारवून, रंगवून आणि फुलांच्या माळा, पताका, तोरणे वगैरे लावून सजवणे, अभ्यंगस्नान करून नवीन कपडे, दागिने घालणे, नातलगांसह फराळ, दिव्यांची रोषणाई, लक्ष्मीपूजन, दीपदान इ. कार्यक्रम सर्वत्र होतात. अज्ञानाचा नाश आणि ज्ञानाचा प्रकाश देणारी ही दिवाळी सर्वांनाच प्रिय आहे. जो तो आपापल्या परीने ती साजरी करतो आणि आनंद लुटतो. दीपावलीच्या अनेक सुखद आठवणींपुढे अनेक दिवस मनांत रेंगाळत राहतात.

दिवाळीच्या सणातला लहान मुला मुलींचा आनंदाचा भाग म्हणजे पणत्या रंगवणे, आकाशकंदील तयार करणे, किल्ला करणे, त्यावर चित्रे मांडणे, संध्याकाळी दारापुढे छान छान रांगोळ्या काढणे आणि फटाके वाजविणे इ. दीपावली हा सण सर्वत्र आनंद व उत्साहाने साजरा होतो. हा उत्सव म्हणजे दीपोत्सव. रात्रीच्या अंधाराला चिरून प्रकाशाचे अस्तित्व निर्माण करणारा दीप मंगलाचे प्रतीक मानला जातो. याच प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधाकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव. दिव्यांचा उत्सव, दिव्यांच्या असंख्य ओळी घरात, अंगणात लावल्या जातात. म्हणून तिचं नाव दीपावली.



## सौ. स्वाती फडणीस

B. F. A. (Applied Arts)

सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट, - मुंबई

गेली १५ वर्ष एक्झिबिशन डिस्प्ले डिझायनर, व्हिजुअलायझर, वेब डिझायनर आणि स्टोरी रायटर म्हणून या क्षेत्रात कार्यरत आहे. त्याच बरोबर पेपर क्विलिंग, पेपर फ्लॉवर्स करणे, वारली पेंटिंग, स्टेन ग्लास पेंटिंग, ऑइल पेंटिंग, पॉट डेकोरेशन, मेहंदी, फोटोग्राफी, वाचन, लेखन असे छंद मी नियमित जोपासत आहे. या सगळ्याचा एक एकत्रित संग्रह करावा या उद्देशाने नक्षत्र उत्सव कलेक्शन हा ब्लॉग करायला घेतला. तशा आणखीन नवीन नवीन कल्पना सुचत गेल्या. त्यातली एक म्हणजे या गोष्टी इतरांना शिकवल्या म्हणून शिबीरे घ्यायचे ठरवले. आणि शिबीर सहभागींना देण्यासाठी नोट्स बनवायला घेतल्या. पणत्या रंगवणे असा साधा सोपा विषय. त्यावर लिहिता लिहिता पाच-सहा ताव केव्हा भरले कळलं सुद्धा नाही. अशा विषयावर आपण एवढं लिहू शकतो. मी बघून माझी मलाच शाबासकी दिली. खूप आनंद झाला. आणि असं म्हणतात की आनंद वाटला की वाढतो. त्यात दिवाळी सारख्या आनंदोस्तवाचा मुहूर्त. असा दुग्धशर्करायोग जुळून आला. पूर्वी इ साहित्य प्रतिष्ठनसाठीच 'लोकल गोष्टी' हे इ-बुक बनवलं होतं. त्याच प्रकारे या हस्तकला उपक्रमाची देखिल इ बुक्स प्रकाशीत व्हावीत म्हणून इ-साहित्याशी वार्तालाप केला. त्यांच्या संमतीनेच आपली आजची शब्दभेट होत आहे. या 'हस्तकला उपक्रमातून' मी तुम्हाला भेटत राहीनच तरी मी बनवलेल्या वस्तू, चित्र आदी बघण्यासाठी, मी घेत असलेल्या शिबिरांची माहिति घेण्यासाठी तुम्ही http://utsavcollection.blogspot.in/ भेट देऊ शकता.

**संपर्क: ९८६७३७५९७१**

nakshatrautsavcollection@gmail.com

nuc.workshops@gmail.com

nuc.products@gmail.com

**चला तर मग या वर्षी आपल्या घरात रंगीबेरंगी पणत्यांचा झगमगाट होऊन जाऊ दे.**

## पणत्या रंगवण्यासाठी साहित्य

















1. मातीच्या पणत्या
2. रंग
3. रंगवण्यासाठी ब्रश
4. प्रायमर
5. पाण्यासाठी भांडे
6. ब्रश पुसण्यासाठी सुती फडके.
7. खाली अंथरायला वर्तमान पत्र, प्लॉस्टीकचा कागद.
8. वॉर्निश
9. पॅकिंगसाठी प्लास्टीक, प्लास्टीकची पिशवी, पुठ्ठा इ.

## पणत्या सजवण्याची / रंगवण्याची प्रक्रिया-

### पणत्या निवडणे / आणणे



बाजारातून दिवाळीच्या सुमारास मिळणाऱ्या मातीच्या पणत्या घेऊन याव्या.

इतर वेळी देखील आपल्याला काही ठिकाणी मातीच्या पणत्या मिळू शकतात पण त्या बऱ्याचदा कोणत्याही नक्षीकामाशिवायच्या साध्या पणत्या असतात.

आपल्याला बाजारात दोन तीन प्रकारच्या पणत्या मिळतात.

1. टेराकोटा क्लेच्या पणत्या:- लाल रंगाच्या असतात. साच्यातून काढल्या असल्यामुळे या प्रकारच्या पणत्यांमध्ये आपल्याला बऱ्याच कला-कुसरीच्या रचना मिळतात.
2. लाल मातीच्या पणत्या:- या देखील रंगाने लालसरच असतात. पण चाकावर बनवलेल्या असल्याने त्यावर सहसा कलाकुसर नसते.
3. पांढऱ्या रंगाच्या पणत्या:- या रंगाने पांढुरक्या असतात. साच्यातून काढल्या असल्यामुळे या प्रकारात देखील आपल्याला बऱ्याच कला-कुसरीच्या रचना मिळतात.
4. सिऱ्यामिकच्या पणत्या :- या पांढरट रंगाच्या साच्यातून काढलेल्या असतात.

### पणत्या स्वच्छ धुणे




विकत आणलेल्या या पणत्या रंगवायला घेण्या आधी त्या पाण्याने स्वच्छ धुऊन घ्याव्यात.
बाजारातून आणलेल्या या मातीच्या पणत्यांवर बरीच धूळ असते. त्या जर तशाच धुळीसकट रंगवायला घेतल्या तर आपली सजावट बिघडण्याची शक्यता असल्याने विकत आणलेल्या या पणत्या रंगवायला घेण्या आधी त्या पाण्याने स्वच्छ धुऊन घ्याव्यात. असे केल्याने पणत्यांवरील धूळ तर निघून जातेच त्या शिवाय या पणत्या मातीच्या असल्याने त्या धुताना पाणी शोषून घेतात. रंगवण्या आधी थोडाच वेळ आधी पणत्या पाण्यातून काढल्याने त्यांच्या या पाणी शोषून घेण्याच्या गुणधर्माचा आपल्याला फायदा करून घेता येतो. पाणी शोषल्यामुळे पणत्या रंगवताना फारसा रंग शोषून घेत नाहीत. आणि आपल्याला कमीत कमी रंगात पणत्या रंगवता येतात.

### पणत्यांसाठी रंग

1. ऑइल पेंटस
2. डिस्टेंपर
3. ऍक्रॉलीक कलर (फॅब्रिक कलर्स)
4. आर्टिस्ट ऑइल कलर्स (ट्युब)
5. पोस्ट्र कलर

अशा विविध माध्यमांचा वापर पणत्या रंगवण्यासाठी करता येतो. त्यातील ऑइल पेंटस, डिस्टेंपर हे खूप मोठ्या प्रमाणावर पणत्या रंगवायच्या असल्यास किफयतशीर ठरतात. आपण आपल्या घरापुरत्या किंवा नातेवाइकांना देण्यापुरत्या पणत्या रंगवणार असू तर ऑइल पेंटस, डिस्टेंपर वाया जाण्याची शक्यताच अधिक. तसेच ऑइल पेंटस, वाळायला बराच काळ लागत असल्यामुळे ऑइल पेंटसनी पणत्या रंगवायला घेतल्यास त्या पूर्ण व्हायला ३ ते ४ दिवस लागतात. त्यामुळे आपण झटपट वाळणाऱ्या आणि अगदी छोट्या प्रमाणात मिळणाऱ्या ऍक्रॉलीक कलर्सची (फॅब्रिक कलर्स) निवड करणार आहोत.



## ब्रशचा वापर



1. ॲक्रॅलीक कलरने पणत्या रंगवताना (फॅब्रिक पेंटस)
2. एक '१२' नंबरचा राउंड ब्रश / छोटा फ्लॅट ब्रश
3. एक साधारण '६' नंबरचा राउंड ब्रश
4. एक '३' नंबरचा राउंड ब्रश
5. एक '0' नंबरचा राउंड ब्रश

असे ४ ब्रश लागतील. पणतीच्या खालील भाग एकाच रंगात रंगवताना पटकन एकसारखा रंग देण्यासाठी आपल्याला फ्लॅट ब्रशचा चांगला उपयोग होतो. बाकी आपण जिथे जितक्या प्रमाणात रंग देणार असू त्यानुसार छोटा मोठा ब्रश निवडायचा म्हणजे कमीत कमी वेळात रंगकाम करता येते. अगदी बारीक नक्षीकाम सुबकपणे करण्यासाठी '0' नंबरचा राउंड ब्रश वापरावा. जसे आपण आधीच नमूद केले आहे की ॲक्रॅलीक (फॅब्रिक) कलर्स लगेच सुकतात. त्यांच्या या गुणधर्माचा आपल्याला एकाच बैठकीत पणतीचे रंगकाम पूर्ण करण्यासाठी खूप उपयोग होणार आहे. पण त्याच वेळी ॲक्रॅलीक (फॅब्रिक) कलर्सचे हे वैशिष्ट्य आपल्या ब्रशना मात्र हानिकारक आहे. त्यामुळे ब्रशने रंगवून झाले की लगेच ब्रश पाण्याने स्वच्छ धुऊन, पुसून ठेवावा. वेळच्या वेळी असे केले नाही तर ब्रशवरील रंग वाळून ब्रशला कडकपणा देईल आणि मग तो ब्रश पुढे वापरता येणार नाही. तसेच ब्रश धुतल्या नंतर तो तसाच पाण्यात ठेवून देऊ नये. ब्रश पाण्याच्या भांड्यातच राहिल्याने त्याच्या केसांवर वजन पडून ते वळण्याची शक्यता असते. अशाने ब्रशचा आकार बिघडतो.

## प्रायमर वापर

आपण आधी पाहिलेच आहे की आपल्याला दोन तीन प्रकारच्या पणत्या मिळतात. त्यातील लाल रंगाच्या पणत्यांना रंग देताना कधी कधी रंग मातकट दिसतात. ते तसे न दिसता आपण जो रंग देत आहोत तो तसाच दिसावा यासाठी हा पांढऱ्या रंगाचा पातळ कोट देता येतो. तो रंग तेजस्वी दिसण्यात साहाय्य करण्या बरोबरच रंग पकडून ठेवण्याचे काम देखील करतो. पण हा देखील ऑइल पेंटच असल्यामुळे त्याला वाळायला १० ते १२ तास द्यावे लागतात.

### पणत्या रंगवताना घ्यायची काळजी

1. ऍक्रॅलीक कलरनी पणत्या रंगवताना (फॅब्रिक पेंटस) ब्रशवर रंग सुकणार नाही याची काळजी घ्यावी लागते.
2. रंग उठावदार दिसण्यासाठी पणत्यांना प्रायमर देऊन घ्यावा.
3. तसेच आपल्याला आपण जिथे कुठे हे रंगकाम करत बसलो आहोत त्या जागेची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी वर्तमान पत्र किंवा प्लास्टीक चा कागद अंथरून त्यावरच रंगकाम करावे.
4. दिलेला रंग सुकेपर्यंत त्याला हात लावू नये.
5. हातांना रंग लागणार नाही याची काळजी घ्यावी. जर आपल्या हाताला रंग लागला असेल तर त्याने पणत्यांवर डाग पडून आपली सजावट बिघडू शकते. त्यामुळे वरचेवर हात फडक्याला पुसून साफ ठेवावेत. आवश्यक असेल तर पाण्याने हात धुउन घ्यावे.
6. तसेच रंग आपल्या कपड्यांना लागणार नाही याची ही काळजी घ्यावी. रंगकाम करताना शक्यतो जुने कपडे किंवा ऍपरनचा वापर करावा.



## पणत्या रंगवण्याची प्रक्रिया




1. पणत्या रंगवताना आतून बाहेरच्या बाजूस रंगवत जावे. असे केल्याने रंग हाताला लागण्याची किंवा रंगाला हात लागण्याची शक्यता कमी होते. तसेच एक रंग वाळून दुसरा देण्यासाठी थांबण्यात वाया जाणारा वेळ देखील वाचतो.
2. आपण पूर्वीच पाहिले आहे, की ऍक्रॅलिक कलर्स लगेच वाळतात. त्यामुळे रंगाचा वापर करून झाल्यावर बाटली लगेच बंद करून ठेवावी. तसेच त्यात एखादा थेंब पाणी घालून मग झाकण बंद करावे. असे केल्याने नंतर बराच काळ रंग वापरले नाहीत तरी सुकत नाहीत.
3. उजळ, रंगीबेरंगी रंगसंगती पणत्यांची आणि रंगीत पणत्यांनी दिवाळीची शोभा वाढवतात.

### वॉर्निशचा वापर

ऍक्रॅलीक कलरने  पणत्या रंगवल्या की त्यांना पुरेसा वेळ देऊन वाळू द्यावे. खरं तर एकदा का रंगकाम संपले की आपली ही सजावट पूर्ण होते. पणत्या नीट ठेवल्या गेल्या नाहीत तर एकमेकांना चिकटून, घर्षणाने ऍक्रॅलीक कलर खराब होण्याची भीती राहते. तसे काही होऊ नये म्हणून त्यावर वॉर्निशचा पातळ लेप देऊन रंगाची काळजी घेता येते. वॉर्निश देखील ऑइल बेस असल्यामुळे त्याला वाळायला प्रायमर प्रमाणेच १० ते १२ तास द्यावे लागतात.

### पॅकिंग करताना

आपण आपल्या घरासाठीच पणत्या केल्या असतील आणि लगेच दिवाळीला सुरुवात होत असेल तर पॅकिंग करण्याची आवश्यकता नाही. पण जर आपल्या आपल्या नातेवाईकांना पणत्या द्यायच्या असतील तर त्या नीट पॅक केल्या पाहिजेत. किती पणत्या एकत्र पॅक करायच्या आहेत त्यानुसार पॅकिंग पद्धत आणि प्रकार निवडता येईल. तसेच भेट देण्याच्या दृष्टीने पॅकिंग देखिल सजवता येईल. सध्या आपण दोन पणत्यांसाठीच्या पॅकिंगचा विचार करणार आहोत.

पॅकिंग केल्यावर देखील पणत्या दिसल्या पाहिजेत म्हणून आपण प्लास्टिकच्या कगदाचा वापर करणार आहोत. दोन पणत्या एकत्र ठेवण्यासाठी आपल्याला जाडसर पृष्ठभाग लागेल. थर्माकोल, बॉक्स बोर्ड, साधा पुठ्ठा, माउंट बोर्ड, इ. या पैकी काही एक साहित्य घेऊन त्याचा पणत्यांना साजेल अशा आकाराचा गोल, चौकोन, आयत, इ. पाहिजे तो आकार कापून घ्यावा. हा कापलेला पृष्ठभाग रंगवून घेतला तर आणखीनच उत्तम. त्या नंतर साधारण त्याच आकाराचा पण कापून घेतलेल्या पृष्ठभागापेक्षा सर्व बाजूंनी इंच इंच जास्त असा प्लास्टिकचा कागद कापून घ्यावा. रंगवलेल्या पृष्ठभागावर सजवलेल्या पणत्या ठरवल्याप्रमाणे ठेवाव्या. वरून प्लास्टिकचा कागद घेऊन सर्व बाजूंनी खाली दुमडावा. व त्याला सेलोटेप किंवा स्टेपलरच्या पिनांनी जागेवर घट्ट बसवावे. भेट देण्यासाठी रिबिन ने त्यावर छानसे फुल, आणि गिफ्ट टॅग लावला की आपल्या पणत्या कोणालाही भेट देण्यासाठी तयार.

पणत्या घरासाठीच वापरायच्या असतील आणि दिवाळीला बराच अवकाश असेल तरी पणत्या पॅक कराव्यात. असे केल्याने त्या धूळ, हाताळताना होणारे घर्षण यांपासून दूर सुरक्षित राहतील.

## रंगवलेल्या पणत्यांचे काही नमुने






1. घराच्या दारा बाहेर,
2. अंगणात
3. तुळशीवृंदावनापाशी
4. घराच्या खिडकीत
5. बाल्कनीत
6. कठड्यावर
7. बाहेरच्या खोलीत

इ. ठिकाणी या पणत्या शोभून दिसतील.

1. हस्तकला उपक्रमातील हे पहिलेच इ-बुक तुम्हाला कसे वाटले?
2. तुम्ही पणत्या रंगवून पहिल्या का? ते मला जरूर कळवा.
3. तुम्हाला आणि कोणत्या हस्तकलेच्या वस्तू करायला, शिकायला आवडतील ते कळवायला विसरू नका.
4. तसेच 'दिवाळी सजावट - पणत्या रंगवणे' या विषयावरील सविस्तर पुस्तक इंग्रजीत हवे असेल तर nuc.workshops@gmail.com या पत्त्यावर मला नक्की कळवा.

पुन्हा भेटूच... असंच काहीतरी नवीन करू...!

# ई साहित्य प्रतिष्ठान

## कला विभाग

जेव्हा आपण मराठी संस्कृती हा शब्द उच्चारतो तेव्हा त्यात मराठी भाषा, कथा, काव्य साहित्य यांबरोबरच वेषभूषा, सण, खाद्यपदार्थ, संगीत, नाट्य, सजावट, गृहरचना हे आणि इतर बरंच काही येतं. महाराष्ट्र हा जितका दणकट तितकाच नाजुक, जितका कणखर तितकाच मुलायम, जितका तिखट तितकाच रसाळ आणि जितका रांगडा तितकाच सोज्ज्वळ आहे. मऊ मेणाहून असे विष्णूदास प्रसंगी वज्राहून कठोर होतात. हीच तर महाराष्ट्राची, मराठी माणसाची खरी ओळख.

अशा या महाराष्ट्राच्या दिवाळसणातल्या पणत्यांच्या सजावटी वरच्या या पुस्तकामागोमाग आकाशकंदिल, तोरणं, रांगोळ्या व सजावटीच्या व अलंकरणाच्या असंख्य प्रकारांवरची सुंदर सुंदर पुस्तकांची मालिकाच या निमित्ताने सुरू होत आहे. स्वाती फ़डणीस या ई साहित्य प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्यांपैकी एक. त्यांच्या “नक्षत्र उत्सव कलेक्शन” या संस्थेच्या वतीने अशा वस्तूंच्या निर्मितीचे आणि विक्रीचे वर्ग भरवले जातात. त्यांनी या पुस्तकांची निर्मिती करून ती विनामूल्य वितरणासाठी ई साहित्य प्रतिष्ठानकडे दिली याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

आपण या पुस्तकांचा लाभ घ्या. इतरांना सांगा. या सोहळ्यात आपले आप्त मित्र समस्त मराठी जन सहभागी व्हावेत. महाराष्ट्राची लोकसंख्या बारा कोटी आहे. म्हणजे इंग्लंड (६ कोटी) च्या दुप्पट. फ्रांस (६ कोटी) च्या दुप्पट, जर्मनी (८ कोटी) च्या दिडपट. पण मराठी संस्कृती जगाच्या एकूण व्यवहारांत जवळपास नगण्यच आहे. खुद्द मराठी मुलं या देशांच्या संस्कृतीला आ वासून बघत असतात. आपल्या स्वतःच्या मनातील हा न्यूनगंड घालवायचा तर आपणच आपल्या संस्कृतीचे महोत्सव साजरे करायला हवेत. ई साहित्य प्रतिष्ठानच्या या महासोहळ्यात आपल्या जवळच्या लोकांना सहभागी करा. फ़क्त त्यांचे ई मेल पत्ते कळवा.

तुमच्या अंगी अशा प्रकारच्या कलांचे ज्ञान असेल तर ते आम्हाला कळवा. आपण आपला हा ठेवा विस्तारित करू. परंपरा जागती ठेवू. या पणत्यांप्रमाणेच मराठी संस्कृतीच्या सौंदर्याचा प्रकाश अखिल जगाला दिपवू दे.

धन्यवाद!

टीम ई साहित्य

www.esahity.com

esahity@gmail.com